पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे - ४११ ०१८
फोन नं. ०२० - ६७३३३३३३
फॅक्स नं. ०२० - २७४२५६००
वेबसाईट :- www.pcmcindia.gov.in

क्र.वैद्य/०९/कावि/४१६०/२०२१ दि.०८.०८.२०२१

विषय : कोरोना विषाणू ( कोविड १९ ) संसर्ग साखळी तोडण्यासाठी "Break The Chain" प्रतिबंधात्मक आदेश.

संदर्भ :
१) शासन परिपत्रक क्रमांक - समय २०२०/प्र.क्र. ३५/ १८ (रा.व.फा.) दिनांक ०७.०४.२०२०
२) मा. विभागीय आयुक्त (पिंपरी चिंचवड) कार्या क्रासा/प्र.१./आरआर/१०२४/२०२० यांचे दिनांक : २८.०८.२०२० रोजीचे पत्र.
३) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल मंत्रालय, मुंबई, क्रमांक कोरोना २०२०/प्रक्र.५८/आरोग्य - ५, दिनांक १४ मार्च २०२०
४) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५
५) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७
६) महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. महसूल व वन विभाग (DMU/2020/CR.92/DISM,1) दिनांक १७ एप्रिल २०२०, २१ एप्रिल, २९ जुन २०२०, ६ जुलै २०२०, ३१ जुलै २०२०, ३१ ऑगस्ट २०२०, ३० सप्टेंबर २०२०, १४ ऑक्टोबर २०२०, २९ ऑक्टोबर २०२०, ३ नोव्हेंबर २०२०, १४ नोव्हेंबर २०२०, २३ नोव्हेंबर २०२०, २७ नोव्हेंबर २०२०, २१ डिसेंबर २०२०, २४ डिसेंबर २०२०, २९ डिसेंबर २०२०, १४ जानेवारी २०२१, १० फेब्रुवारी २०२१, १५ मार्च २०२१, २७ मार्च २०२१, ०४ एप्रिल २०२१, १३ एप्रिल २०२१, २० एप्रिल २०२१, २१ एप्रिल २०२१, २९ एप्रिल २०२१, १२ मे २०२१ ३० मे २०२१, ०४ जुन २०२१, २५ जुन २०२१
७) मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे आदेश जा. क्र. वैद्य.०९.कावि.१२९६.२०२१ दि. १४ एप्रिल २०२१, क्र. १३१७, दि. १७ एप्रिल २०२१, क्र. १३२१, दि. २०.०४.२०२१, क्र. १३६९ दि. २२.०४.२०२१, क्र. १५५८ दि. ३०.०४.२०२१, क्र. १६११ दि. १३.०५.२०२१, क्र. १६८६ दि. १९.०५.२०२१, क्र. २०४४ दि. २९.०५.२०२१, क्र. २०४६ दि. ३१.०५.२०२१, क्र. २४०३ दि. ०५.०६.२०२१, क्र. २५१२ दि. ११.०६.२०२१, क्र. २६२६ दि. १९.०६.२०२१, क्र. २६६५ दि.२६.०६.२०२१, क्र. २७८८ दि. ०३.०७.२०२१, क्र. २९२३ दि. ११.०७.२०२१, क्र. ३०१६ दि. १७.०७.२०२१, क्र. ४०४० दि. ०१.०८.२०२१.

**आदेश,**

ज्याअर्थी उपरोक्त संदर्भ क्र. ०६ मधील आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात कोविड १९ या आजाराच्या प्रसारास प्रतिबंधीत करण्यासाठी उपाययोजना व मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

ज्याअर्थी, राज्यातील कोविड १९ च्या प्रसारास प्रतिबंध करण्याकरिता प्रसारणाची साखळी प्रभावीपणे खंडित करण्यासाठी लावलेले निर्बंध जिल्हानिहाय / प्रशासकीय युनिटनिहाय शिथिल करणे तसेच विविध

आर्थिक आणि सामाजिक उपक्रम नियोजनबद्ध सुरु करण्याच्या अनुषंगाने राज्य शासनाने सुधारित आदेश निर्गमित केलेले आहेत.

ज्याअर्थी, अन्वये राज्यात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या कोविड १९ या संसर्ग रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम २०२० अंमलात आलेले आहेत महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड १९ च्या प्रसारास पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे. साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **मी राजेश पाटील, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,** पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रामध्ये कोविड १९ च्या प्रसारास प्रतिबंधित करण्यासाठी इकडील ०५.०६.२०२१ रोजीचे आदेशातील निर्बंध पुढीलप्रमाणे अंशतः शिथिल करीत आहे..

१) इकडील दि. ०५.०६.२०२१ रोजीचे आदेशामधील नमूद **अत्यावश्यक सेवेची** सर्व दुकाने व आस्थापना आठवड्यातील सर्व दिवस पूर्ण वेळ सुरु राहतील.

२) इकडील दि. ०५.०६.२०२१ रोजीचे आदेशात नमूद अत्यावश्यक सेवेची सर्व दुकाने व आस्थापना वगळता इतर दुकाने व आस्थापना आठवड्यातील सर्व दिवस रात्री ०८.०० वाजेपर्यंत सुरु राहतील ( त्या दुकानांची साप्ताहिक सुट्टी वगळून ).

३) शॉपिंग मॉल लसीकरणाचे दोन्ही डोस पूर्ण केलेल्या नागरिकांकरिता रात्री ०८.०० वाजेपर्यंत सुरु राहतील. तथापि, नागरिकांनी दोन्ही डोस पूर्ण झालेबाबत प्रमाणपत्र सोबत बाळगणे अनिवार्य राहील. शॉपिंग मॉल मध्ये काम करणा-या कामगार व इतर व्यक्तींची रॅपिड अँटिजेन चाचणी ( RAT ) प्रत्येक पंधरा दिवसांनी करणे बंधनकारक राहील. कोविड नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी मॉल व्यवस्थापनाची राहील.

४) रेस्टॉरंट, बार, फूड कोर्ट हे आठवड्यातील सर्व दिवस रात्री १०.०० वाजेपर्यंत आसन क्षमतेच्या ५०% क्षमतेने सुरु राहतील. घरपोच सेवा ( Home Delivery ) रात्री ११.०० पर्यंत सुरु राहतील. सर्व रेस्टॉरंट, बार, फूड कोर्ट इ. यांना दर्शनी भागावर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने दिलेल्या सुचनांचे स्टीकर्स लावणे बंधनकारक असेल.

५) जलतरण तलाव व निकट संपर्क येणारे सर्व क्रीडा प्रकार वगळून अन्य इनडोअर व आऊटडोअर खेळ हे नियमितपणे सुरु राहतील.

६) सार्वजनिक उद्याने आठवड्यातील सर्व दिवस नियमित वेळेत सुरु ठेवता येतील.

७) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्राथमिक, माध्यमिक शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था यांचे नियमित वर्ग पुढील आदेशापर्यंत पूर्णतः बंद राहतील. मात्र ऑनलाइन शिक्षणास मुभा राहील.

८) स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र / क्लासेस ( Coaching classes ) हे सर्व दिवस रात्री ०८.०० वाजेपर्यंत आसन क्षमतेच्या ५०% क्षमतेने सुरु राहतील. सदर ठिकाणी प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थी यांचे लसीकरण ( किमान एक डोस ) अनिवार्य आहे.

९) व्यायाम शाळा ( Gym ), सलून, ब्युटी पार्लर, स्पा, Wellness centers आसनक्षमतेच्या ५०% क्षमतेने पुर्व नियोजित वेळेनुसार ( By appointment ) रात्री ०८.०० वाजेपर्यंत सुरु राहतील, सदर ठिकाणी वातानुकुल ( A.C. ) सुविधा वापरता येणार नाही.

१०) सर्व प्रकारची धार्मिक स्थळे मा. राज्य शासनाच्या पुढील आदेशापर्यंत बंद राहतील.

**११) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये रात्री ११.०० वाजेपर्यंत जमावबंदी असेल व रात्री ११.०० ते पहाटे ०५.०० वाजेपर्यंत ( अत्यावश्यक कारण वगळता ) संचार बंदी लागू राहील.**

१२) या आदेशातील नमूद बाबी व्यतिरिक्त इतर बाबींसाठी दि. २६.०६.२०२१ निर्गमित आदेश लागू राहतील.

१३) मा. राज्य शासनाने व इकडील संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

कोविड १९ च्या प्रतिबंधासाठी केंद्र सरकार / राज्य शासन आणि या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सुचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६० तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार, अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहील.

सदर आदेश दि. ०९.०८.२०२१ पासून पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात लागू राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दि. ०८.०८.२०२१ रोजी दिलेला आहे.

08/08/21

**(राजेश पाटील)**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

**प्रत माहितीस्तव सादर -**

१) मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे.
२) मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.
३) मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालय, चिंचवड.
४) सर्व क्षेत्रिय अधिकारी व सबंधित विभाग प्रमुख, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित